Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, रविवार, २७ मे २०१८

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

रविवार लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

तापमान कमाल ३९.२° से किमान २४.३° से

हवामानाचा अंदाज

आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता.

# सीबीएसई बारावीत पुण्यातील विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

(पान ३वरून) पटकावले. ऑर्किड स्कूलच्या परीक्षा दिलेल्या ८६ विद्यार्थ्यांपैकी १५ विद्यार्थ्यांना ९१ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले. या शाळेतील चार विद्यार्थी दिव्यांग होते आणि त्यांना शैक्षणिक अडचणीही होत्या. मात्र, त्यांनीही या परीक्षेत उत्तम कामगिरी करत यश संपादन केले. ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूलच्या आयुषी कश्यपने ९२.८ टक्के गुण मिळवत विज्ञान शाखेत पहिले स्थान मिळवले. तर, वाणिज्य शाखेच्या जुईली पटवर्धनने ९५ टक्के गुणांसह पहिला क्रमांक पटकावला. खडकीच्या आर्मी पब्लिक स्कूलचा निकालही १०० टक्के लागला. विज्ञान शाखेच्या अरुणिमा बंदोपाध्यायने ९६.२ टक्के, कला शाखेच्या मनस्वी पांडे आणि वाणिज्य शाखेच्या झायनाह सोमजी यांनी ९६ टक्के गुण मिळवले.

दिल्ली पब्लिक स्कूलच्या वाणिज्य शाखेत उत्कर्ष सिंघानियाने ९७.२ टक्के गुण पटकावले. तर, कला शाखेत रय्यान शब्बीर खानने ९७ टक्के आणि विज्ञान शाखेत श्रुती निशिथने ९६.२ टक्के गुण संपादन केले.

जीजी इंटरनॅशनल स्कूलच्या एकूण ८७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यातील ६१ विद्यार्थी विज्ञान शाखेतून आणि २६ विद्यार्थी वाणिज्य शाखेतून परीक्षेला बसले होते. त्यातील ४४ टक्के विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता प्राप्त केली. विज्ञान शाखेच्या सांची थवानीला ९५.४ टक्के आणि विज्ञान शाखेच्या मानसी गुप्ताला ९५ टक्के गुण मिळाले. गोयल गंगा इंटरनॅशनल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला.

'यंदा पहिल्यांदाच आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. आमच्या वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के आणि विज्ञान शाखेचा निकाल ९९ टक्के लागला. अश्विन शेणईने ९६.६ टक्के गुणांसह विज्ञान शाखेत अग्रस्थान मिळवले. तर, वाणिज्य शाखेच्या सात्त्विक बन्सलने ९०.६ टक्के गुण मिळवले,' असे कोंढवा येथील मनसुखभाई कोठारी नॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका प्रज्ञा गोखले यांनी सांगितले.

वानवडीच्या सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या २२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यातील ३६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले. त्यातील विज्ञान शाखेच्या शरॉन माथूरने सर्वाधिक ९७ टक्के गुण पटकावले. संस्कृती प्रशालेचा पुन्हा एकदा १०० टक्के निकाल लागला. त्यात आदर्श मोहन निंगानूर ९४ टक्के गुणांसह शाळेत पहिला आला. 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शाळेत होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सामावून घेतले जाते. सातत्य आणि निष्ठेने विद्यार्थ्यांनी अभ्यास केला होता. त्याचे फळ त्यांना उत्तम गुणांच्या रुपाने मिळाले,' असे प्रशालेच्या संचालिका देवयानी मुंगळी यांनी सांगितले.